# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १५/०६/२०२४ (शनिवार) सकाळ**

---

## बकरी चोरी करणारे आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळयात

पोलीस स्टेशन मौदा अप क्र. ५१८/२४ कलम ३७९ भा.दं.वि चे गुन्हयाचे समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण करीत असता गुप्त माहितगाराकडून खात्रीशीर माहीती प्राप्त झाली की, फूकट नगर नागपूर येथे राहणारा सोहेल मेहबुब शहा, वय २१ वर्ष, रा. फूकट नगर इटाभट्टा चौक नागपूर हा मागील काही महिन्यापासून आपले साथीदारांसह मिळून बकरी चोरीचे गुन्हे करीत आहे. अशा खबरेवरून दि. १४/०६/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुन्हयातील आरोपीचा कसोशीने शोध घेवुन सोहेल शहा यास फूकट नगर येथुन ताब्यात घेतले. त्यास भुगाव मौदा येथील बकरी चोरीबाबत विचारपुस केली असता उडवाउडविचे उत्तरे दिली. त्यास विश्वासात घेवुन अधिक विचारपुस केली असता त्याने सांगितले की, त्याने त्याचे साथीदार नामे– १) फैजान हफीज शेख वय २१ वर्ष रा. उप्पलवाडी रजा टाऊन नागपूर २) मोहम्मद समीर मोहम्मद अब्दुल रहीम, वय २१ वर्ष, रा. नविन वस्ती दुर्गा मंदीरचे मागे टेकानाका नागपूर यांचे सोबत मिळुन समीर याची मारोती व्हॅगन आर क्र. एम.एच–३१/बी बी– ९७६७ तसेच फैजान याची महिंद्रा झायलो क्र. एम. एच–०४/डीवाय–६३३६ चा वापर करून वेलतूर, कळमेश्वर तसेच मौदा परीसरातून वेगवेगळया दिवशी बकरी व बकरे चोरी केल्याची कबुली दिली. सदर चोरी केलेले बकरे व बकऱ्या त्यांनी अविनाश रामदास निखारे, वय ३२ वर्ष, रा. नारायणपेठ प्रेम नगर वडे कंपनी जवळ नागपूर यास विकल्याचे सांगितले. आरोपीतांना ताब्यात घेवुन आरोपीतांकडुन गुन्हयात वापरलेली वाहने समीर याची मारोती व्हॅगन आर क्र. एम. एच–३१/बी बी–९७६७ किंमती १,००,०००/–रू. तसेच फैजान याची महिंद्रा झायलो क्र. एम. एच–०४/डीवाय–६३३६ किंमती ३,००,०००/–रू. असा एकुण ४,००,०००/–रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीतांना पुढील कायदेशीर कारवाई करीता पोस्टे मौदा, कळमेश्वर, वेलतूर यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. उघडकीस आलेले गुन्हे खालीलप्रमाणे:– १) पोस्टे मौदा अप क्र. ५१८/२४ कलम ३७९ भादंवि. २) पोस्टे कळमेश्वर अप क्र. ३२८/२४ कलम ३७९ भादंवि. ३) पोस्टे कळमेश्वर ३२९/२४ कलम ३७९ भादंवि. ४) पोस्टे वेलतूर अप क्र. ८९/२४ कलम ३७९ भादंवि.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, पोउपनि बट्टुलाल पांडे, पोहवा विनोद काळे, ईकबाल शेख, पोना संजय बरोदीया, पोशि अभिषेक देशमुख, चालक पोहवा मुकेश शुक्ला सायबर सेलचे सतिश राठोड यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर